**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.८ याची व्ही. सी. लिंकद्वारे जबानी.</u>**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – डॉ. राहूल नामदेव पंडीत,

वय – ४८ वर्षे, व्यवसाय– वैद्यकिय अधिकारी,

राहणार – अहिल्यानगर, स्वास्तीक चौक, स्टेशन रोड.

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. के. साबळे यांचे मार्फत सुरुः–</u>**

१. दि.२७.०६.२०१३ रोजी मी पंडीत ॲक्सीडेंट हॉस्पीटल येथे अस्थीरोग तज्ञ म्हणून कार्यरत होतो. मला या कामाचा २० वर्षांचा अनुभव आहे. मी वेगवेगळ्या प्रकारचे रुग्ण तपासतो. त्या दिवशी हॉस्पीटलमध्ये विठ्ठल काळे व रुख्मीणी काळे हे दोन रुग्न तपासणीसाठी आले होते. त्यापैकी विठ्ठल काळे यांच्या डाव्या हाताला व उजव्या पायाला फ्रॅक्चर होते. मी त्यांच्यावर उपचार केले. त्यांचे ऑपरेशन केले. ते आमच्याकडे चार दिवस ॲडमिट होते.

२. रूख्मीणी काळे यांची तपासणी केली असता त्यांच्या शरीरावर कुठेही फ्रॅक्चर आढळून आले नाही. त्यांना हाताला मुका मार होता. हाताच्या तिस–या बोटाभोवती काळे निळे झाले होते. हाताला सुज आलेली होती. रुख्मीणी काळे यांना ॲडमिट करण्याची गरज नसल्याने गोळया औषधे देवून उपचार केले. त्याप्रमाणे मी दोघांचे वैद्यकिय प्रमाणपत्र दिले. आता मी मला पाठविण्यात आलेले दोन्ही प्रमाणपत्र पाहिले. त्यावर माझी सही व हॉस्पीटलचा शिक्का आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ८० व ८१** देण्यात येते.

३. प्रमाणपत्र मिळण्याकरीता पोलीसांनी मला दिनांक २९.०६.२०१३ पत्र दिले होते. ते पत्र आमच्या दवाखान्यात मिळाल्याबाबत सही आहे. (सदर पत्रास सहायक सरकारी अभियोक्ता यांनी निशाणी क्रमांक देण्याकरीता सांगितले. परंतु, सदर पत्रावर प्रस्तुत साक्षीदाराची सही नसल्याने निशाणी क्रमांक देण्यात येत नाही.) त्या पत्रावर डॉ. हर्षल यांची पत्र मिळाल्याबाबत सही आहे. ती सही मी

ओळखतो. (सहायक सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास निशाणी क्रमांक ८० व ८१ वरील जखमा या गजाने व कु–हाडीने होवू शकतात असा प्रश्न विचारला. त्यास आरोपीतर्फे विधीज्ञ यांनी सदरचा प्रश्न उत्तरसुचक असल्याने विचारता येणार नाही असा आक्षेप घेतला. सदरचा प्रश्न उत्तरसुचक असल्याने नोंदविण्यात येत नाही.) निशाणी क्र. ८० व ८१ वरील जखमा या कठीण व बोथट हत्याराने मारहाण केल्यामुळे होवू शकतात.

**(साक्षीदाराच्या तोंडी विनंतीवरून सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.)**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

**स्वाक्षरीत/–**
**(संध्या यु. सुळ)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२),नेवासा

दिनांक–१५/१२/२०२५.

## CERTIFICATE

The evidence of witness is recorded through clear and audible video electronic means by creating a video link with the help of Computer Section authorized by The Hon'ble District Court, Newasa on the computer with web camera provided on dias of the Court after the consent given by both the parties for it and thereafter verifying the identity of the person deposing through video link. The evidence is taken before me and signed by me in the presence of the Ld. Advocate on behalf of accused and the witness, to whom the deposition was explained.

R.O.A.C.

Sd/-
**(Smt. S. Y. Sul)**
Judicial Magistrate First Class,
(Court No. 2), Newasa.

Date- 15/12/2025